कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२४–२५/१८८३
दि.२७/११/ २०२४

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीची ५७ वी मराठी 'अ' गट नाट्यस्पर्धा दि. २६ डिसेंबर २०२४ पासून सुरू होत असून यंदाच्या स्पर्धेत एकूण १८ नाट्यसंस्था सहभागी झाल्या आहेत. ही स्पर्धा दिनानाथ मंगेशकर कला मंदिर, पणजी येथे रोज सायं. ७.00 वाजल्यापासून दि. १६ जानेवारी २०२५ पर्यंत चालणार आहे.

स्पर्धेच्या नियोजित कार्यक्रमानुसार दि. २६ डिसेंबर २०२४ रोजी इंद्रेश्वर यूथ क्लब गावडोंगरी –काणकोण या संस्थेच्या दिलीप जगताप यांनी रुपांतरीत केलेलं **"रंगे हात"** या नाटकाच्या सादरीकरणाने प्रारंभ होत असून दि. २७ डिसेंबर रोजी संभाजी सावंत यानी लिहिलेले **"नाती चरामी"** हे नाटक प्रेरणा थिएटर्स्, सडा-वास्को ही संस्था सादर करणार आहे. विकास मंच सोशल क्लब वाळपई–सत्तरी या संस्थेच्या वतीने संजीव रामकृष्ण बर्वे लिखित **"आकंद"** हे नाटक दि. ३0 डिसेंबर रोजी होईल. मिलींद बर्वे यांनी अनुवादित केलेलं **"बर्फाग्नी"** हे नाटक दि. ३१ डिसेंबर रोजी अभय थिएटर अकादमी-गोवा पाळी, सुर्ला-डिचोली ही संस्था सादर करेल तर दि. १ जानेवारी २०२५ रोजी प्रेमानंद गज्वी यांनी लिहिलेले **"किरवंत"** हे नाटक श्री केलंबिका कला मंच मुळगांव-अस्नोडो ही संस्था सादर करणार आहे. दि. २ जानेवारी रोजी कौस्तुभ नाईक यांनी रुपांतरीत केलेलं **"ब्राम्हणकन्या"** या नाटकाचा प्रयोग गोमंत विद्या निकेतन, मडगाव ही संस्था सादर करणार आहे.

भुमिका थिएटर, साळ-डिचोली ही संस्था अमर प्रसादी यांच्या लेखणीतून साकार झालेल्या **"अव्यक्त सावल्या"** हे नाटक दि. ३ जानेवारी रोजी सादर करेल. श्री साई कला मंडळ सांगोल्डा-बार्देश ही संस्था ॲड. सिताराम रेडकर रुपांतरीत केलेले **"ऑक्टोपस"** हे नाटक दि. ४ जानेवारी रोजी सादर करेल. दि. ६ जानेवारी रोजी अंतरा भिडे यानी लिहिलेले **"तिऱ्हाईत"** हे नाटक मांगिरीश युथ क्लब, मंगेशी म्हार्दोळ–फोंडा ही संस्था सादर करणार आहे. सियावर राम, पिळगांव-डिचोली या संस्थेच्या वतीने धनंजय मांडवकर लिखित **"मरणप्राय"** हे नाटक दि. ७ जानेवारी रोजी होईल. नारायण आनंद खराडे यांच्या लेखणीतून साकार झालेले **"अकबर ख्रिस्ताव झाला?"** हे नाटक दि. ८ जानेवारी रोजी श्री शिव चिदंबर सांस्कृतिक आणि कला मंडळ, कुडणे साखळी ही संस्था सादर करेल तर दि. ९ जानेवारी रोजी योगेश सोमण यांनी लिहिलेले **"ती खिडकी"** हे नाटक रुद्रेश्वर युवक संघ, पणजी ही संस्था सादर करणार आहे.

दि.१0 जानेवारी रोजी रुद्रेश्वर, पणजी या संस्थेच्या सदानंद रेगे अनुवादित **"मीडीया"** हे नाटक सादर करणार असून दि. ११ जानेवारी रोजी सुशांत लक्ष्मीकांत नायक यानी

रुपांतरीत केलेलं **"असावा सुंदर चॉकलेटचा बंगला"** हे नाटक श्री नागेश महालक्ष्मी प्रासादिक नाटयसमाज, बांदिवडे-फोंडा ही संस्था सादर करणार आहे. अथश्री, फोंडा या संस्थेच्या वतीने डॉ. स्मिता जांभळे लिखित **"का?"** हे नाटक दि. १३ जानेवारी रोजी होईल. जयंत पवार यांच्या लेखणीतून साकार झालेले **"लिअर ने जगांव की मरावं?"** हे नाटक दि. १४ जानेवारी रोजी श्री शांतादुर्गा कला आणि क्रिडा संघ नॉन मॉन-वास्को ही संस्था सादर करेल तर दि. १५ जानेवारी २०२४ रोजी झिलु गांवकर यांनी रुपांतरीत केलेल **"वुमन"** या नाटकाचा प्रयोग रसरंग, उगवे ही संस्था सादर करणार आहे. दि. १६ जानेवारी रोजी स्पर्धेचा समारोप श्री हनुमान सेवा समिती नानोडा-सत्तरी या संस्थेच्या नारायण आशा आनंद यांनी रुपांतरीत केलेलं **"चाटा आणि वाटा"** या नाटकाने होणार आहे.

स्पर्धेतील सर्व नाटयप्रयोग रोज सायं.७.०० वाजता दिनानाथ मंगेशकर कला मंदिर, पणजी येथे होणार असून रु.१००/-च्या प्रवेशिका प्रत्येक नाटयप्रयोगाच्या दिवशी दिनानाथ मंगेशकर कला मंदिर, पणजी येथे तिकिट काऊंटरवर उपलब्ध असतील याची नाटय रसिकांनी नोंद घ्यावी असे कला अकादमीने कळवले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड/एसजी